# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


जा.क्र.लेखा/२९/कावि/७४/२०२४

दिनांक :-२२/०५/२०२४

## परिपत्रक

विषय : सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रकातील तरतूदींचे वाढ-घट प्रस्तावांबाबत.

संदर्भ:- मा.आयुक्त सो यांचे कडील परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/७६/२०२२ दि.२३/०५/२०२२

मा.आयुक्त सो यांनी सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रकास मान्यता दिली असून सदर अंदाजपत्रकाची अंमलबजावणी सर्व विभागांनी करणेकामी सर्व विभागांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. लेखा विभागाकडे काही विभागांकडून विकास कामांना तरतूदी कमी / अपु-या असल्याने अंदाजपत्रकीय तरतूदींचे वाढ-घट प्रस्ताव सादर केले जात आहेत. परंतु काही विभागांकडून अंदाजपत्रकीय तरतूद वाढ-घट प्रस्ताव लेखा विभागाकडे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्रायाकामी सादर न करता थेट मा.आयुक्त सो यांची मान्यता घेऊन लेखा विभागाकडे अंदाजपत्रकीय तरतूद वाढ-घट प्रस्ताव/आदेश अंमलबजावणी करणेकामी पाठविल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब ही आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने योग्य नाही. सदर प्रस्ताव व आदेशांची लेखा विभागामार्फत तपासणी केली असता त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत उदा. अंदाजपत्रक पानांक व अनुक्रमांक चुकणे, घट करणेकामी प्रस्तावित केलेल्या तरतूदींमध्ये तरतूद शिल्लक नसणे अथवा ज्या विभागामधुन तरतूद घट केलेली आहे त्या विभागप्रमुखांची तरतूद घट करणेकामी परवानगी न घेणे, अत्यावश्यक बाबींच्या लेखाशिर्षांमधून तरतूद घट करणे, कामाची नावे चुकणे, स्थायी समिती ठराव क्रमांक चुकणे, इत्यादी. अशा प्रस्ताव व आदेशातील असलेल्या त्रुटींमुळे सदर प्रस्ताव / आदेशाची अंमलबजावणी करता येऊ शकत नाही. मनपा अंदाजपत्रकामध्ये कोणत्याही विभागप्रमुखांस कोणताही बदल / अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ-घट करावयाची असल्यास आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा अभिप्राय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब, सर्व विभागप्रमुखांना सुचीत करणेत येते की, अंदाजपत्रकातील तरतूदींची वाढ-घट अथवा अंदाजपत्रकामध्ये कोणताही बदल करावयाचे असल्यास विभागप्रमुखांनी अंदाजपत्रकीय तरतूद वाढ-घट प्रस्ताव मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्रायाकामी सादर करणेत यावेत. लेखा विभागामार्फत सदर प्रस्तावाची तपासणी करून योग्य असल्यास मा.आयुक्त सो यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येतील. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्रायाशिवाय विभागांनी परस्पर अंदाजपत्रकीय तरतूद वाढ-घट प्रस्ताव मा.आयुक्त सो यांचे मान्यतेकामी सादर करू नयेत. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

Pravin Jain

( प्रवीण जैन )

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी

प्रति:- सर्व संबंधीत विभाग/ विभागप्रमुख